# शेतकरी संघटक

पाक्षिक

आंदोलन विशेषांक - १

वार्षिक वर्गणी रु. ३०

किंमत १ रुपया २५ पैसे

वर्ष ९ वे | ६ नोव्हेंबर १९९२ | अंक १५ वा


## न्हावा-शेवा बंदर नाकेबंदीच्या निमित्ताने –

# गहू-आयात विरोधामागील संघटनेची भूमिका

**न्हावा-शेवाची नाकेबंदी का?**

महाराष्ट्रातील शेतकरी परदेशातून होणारी गव्हाची आयात थांबवण्यासाठी न्हावा-शेवा बंदरावर मोर्चा काढणार हे जाहीर झाले आहे. (पान ४ वरील प्रसिद्धीपत्रक पाहा). नाकेबंदीची तारीख, नक्की जागा, अजून जाहीर झालेली नाही. नोव्हेंबरच्या शेवटी किंवा डिसेंबरच्या सुरवातीस आयात गहू घेऊन येणारी गलबते बंदरात येण्याचा कार्यक्रम जाहीर झाला म्हणजे नाकेबंदी कार्यक्रमाच्या नक्की तारखा जाहीर होतील. सध्या शेतकऱ्यांना मिळालेला आदेश इतकाच – १४ नोव्हेंबरला गावोगाव नेहरूनीतीचे दहन करून त्यांनी मुंबईकडे कूच करण्याकरितां सज्ज राहावे आणि नंतर जसा कार्यक्रम जाहीर होईल त्याप्रमाणे 'नाकेबंदी' साठी निघावे.

गव्हाच्या आयातीस संघटनेचा विरोध का, यासंबंधी विचार स्पष्ट असणे आवश्यक आहे.

**शेतकरी संघटनेचा अन्नधान्याच्या आयातीस विरोध आहे काय?**

नाही. संघटनेचा खुल्या अर्थव्यवस्थेस आणि खुल्या व्यापारास पाठिंबा आहे. आयातीवरही बंधने नसावीत आणि निर्यातीवरही निर्बंध नसावेत असा संघटनेचा आदर्श आहे.

आयात व निर्यात खुल्या व्यापराने व्हावी. ज्याचे उत्पादन चांगल्या प्रतीचे असेल त्याचा माल कमी प्रतीच्या मालापेक्षां अधिक खपला पाहिजे. मालाची प्रत सारखीच असली तर ज्या मालाची किंमत कमी असेल तो माल अधिक खपेल हा खुल्या बाजारपेठेचा नियम आहे. या नियमानेच सर्वसामान्य ग्राहकराजाचे भले होऊ शकते आपल्या देशातील निर्यातीला उत्तेजन देण्यासाठी कोणत्याही सरकारने निर्यात- सबसिडी दिली तर कदाचित् त्या देशातील काही शेतकऱ्यांचा काही काळ फायदा होईल. पण, त्यामुळे बाकीच्या सगळ्यांचे नुकसानच होईल.

एखाद्या देशात चांगला माल कमी खर्चात तयार होत असेल तर असा माल अनिर्बंधपणे जगभर उपलब्ध झाला पाहिजे. अशा मालाच्या निर्यातीवर शासनाने निर्बंध घातले तर जगाचे नुकसान होईल, उत्पादकांचे नुकसान होईल; काही काळापुरते देशातील गिऱ्हाईकांचे भले झाले असे वाटले तरी तेही काही खरे नाही. निर्यातबंदीने नाउमेद झालेले उत्पादक थंडावले तर मग गिऱ्हाईकांवर पश्चात्ताप करण्याची वेळ येईल.

निर्यातीवर बंधने घालणे किंवा निर्यातीस प्रोत्साहन देण्याकरितां सूट-सब्सिडी देणे हे दोन्ही शेवटी सर्वांच्याच तोट्याचे आहे. अमेरिका, युरोप, जपान या देशांत निर्यातीसाठी सब्सिडी दिली जाते. उलट, भारतात निर्यातीवर बंदी घातली जाते. दोन्ही धोरणे चूकच.

जगातील बहुतेक देशात आयातीवर बंधने घातली जातात. आयात मालावर कर लावला म्हणजे विलायती माल महाग होतो व देशी माल जास्त खपतो अशा बुद्धीने आयातीवर निर्बंध लादले जातात. पण ही बुद्धीही खोटी. आयात निर्बंधाच्या तटबंदीमागे देशी उत्पादक गलथान होतात. त्यांची कार्यक्षमता घटते आणि शेवटी निर्बंध लादणाऱ्या देशाचे नुकसानच होते.

हा तर भारताचा ताजा अनुभव आहे. भारतीय कारखानदारीला प्रोत्साहन देण्याकरितां सरकारने आयातीवर बंधने घातली, आयातींवर कर लावले पण, अशा मार्गाने आयात फारशी थांबली नाही. उलट, तस्करांना उत्तेजन मिळाले आणि कारखानदारी मात्र गबाळग्रंथी झाली, गुणवत्ता घटली, उत्पादनखर्च वाढले आणि कारखानदारी मालाची निर्यात करणे अशक्य झाले. त्यामुळे, देशावर अरिष्ट कोसळले.

आपल्याच देशातील उत्पादकांना बुडवण्यासाठी महागडा माल परदेशातून आणून तो देशात ओतणे असे करंटे धोरण चालवण्याचा दळभद्रीपणा फक्त 'नेहरू मुखवट्याचे' सरकारच करू शकते. शेतकरी संघटना या असल्या उफराट्या आयातीचा विरोध करते आहे.

**म्हणजे, आयात केलेला गहू भारतातील**

**गव्हाच्या तुलनेने स्वस्त असता तर संघटनेने त्याला विरोध केला नसता?**

अगदी बरोबर. भारतातील शेतकरी आंदोलनाचे दैदीप्यमान वैशिष्ट्य आहे. आपल्या संकुचित स्वार्थासाठी संघटना लढत नाही. सगळ्यांच्या दीर्घकालीन भल्यासाठी संघटना लढते.

आजही अमेरिका, युरोप, जपान या देशांतील शेतकरी 'आम्हाला सबसिडी पाहिजे, शेतीमालाच्या आयातीवर बंदी पाहिजे, निर्यात करण्यासाठी मदत पाहिजे' असा अट्टाहास धरतात.

'सूटसबूसिडीचे नाही काम, आम्ही घेऊ घामाचे दाम' ही संघटनेची घोषणा आहे. खतावरील सबसिडी रद्द झाली, संघटनेने त्याचे स्वागत केले. शेतीमालाच्या निर्यातीवर बंधने आहेत ती उठवा हा संघटनेचा एक आग्रह आहे. दुसरा आग्रह असा की परदेशातून शेतीमाल येथल्यापेक्षा अधिक चांगला, स्वस्त मिळत असेल तर त्याचा फायदा भारतवासीयांना मिळाला पाहिजे. अशा भल्याच्या मार्गात शेतकऱ्यांचा स्वार्थ आड येता कामा नये. मालाच्या किंमतीबाबत किंवा प्रतीबाबत भारतीय शेतकरी स्पर्धा करू शकत नसेल तर त्याने पीक बदलले पाहिजे आणि असे काही पीक घेतले पाहिजे की. बाजारपेठेत स्पर्धा करून त्याला उभे राहता येईल.

काही महिन्यांपूर्वी फ्रान्समधील शेतकऱ्यांनी इंग्लंडमधून येणाऱ्या मांसाच्या आयातीला विरोध केला. इंग्लंडमधून येणारे मांस स्वस्त असते, त्याची आयात झाली तर फ्रान्समधील शेतकऱ्यांचा धंदा बुडेल अशी त्यांची तक्रार होती. फ्रेंच नागरिकांनी महाग असले तरी फ्रेंच मांसच खाल्ले पाहिजे असा त्यांचा हट्ट होता. भारतीय शेतकऱ्यांची अशी भूमिका नाही.

अमेरीकेतील गहू आमच्या गव्हापेक्षा स्वस्त असेल किंवा चांगला असेल तर त्याचा फायदा भारतातील गोरगरिबांना अवश्य मिळाला पाहिजे. अशा आयातीला संघटनेने विरोध कधीही केलेला नाही. पण, परदेशातील कमी प्रतीचा आणि महागडा माल आयात करून तिजोरीवर भार घालून तो स्वस्त भावात विकणे आणि देशातील बाजारभाव पाडणे हे देशद्रोही कृत्य आहे. ते शेतकरीविरोधी तर आहेच. पण, देशातील गोरगरिबांच्या अकल्याणाचे आहे म्हणून संघटना या आयातीचा विरोध करण्यास ठाकली आहे.

पंतप्रधानांनी म्हटले आहे की, ''देशातील लोकांना अन्नधान्याचा पुरवठा करणे ही सरकारची जबाबदारी आहे. एखाद्या वर्षी पुरवठा कमी पडला तर आयात करण्यात सरकारचे काय चुकले?''

देशात अन्नधान्याचा तुटवडा मुळीच नाही. असा तुटवडा असल्याचे पंतप्रधानांनी म्हटलेलेही नाही. सरकारी रेशन दुकानासाठी आवश्यक तेवढा गहू शेतकऱ्यांनी सरकारला विकला नाही; नव्वद लाख टनाऐवजी पासष्ट लाख टन गहू सरकारला मिळाला म्हणून सरकार ३० लाख टन गव्हाची आयात करीत आहे अशी पंतप्रधानांची फुशारकी आहे.

**सरकारला पुरेसा गहू का मिळाला नाही?**

शेतकऱ्यांनी गहू जास्तीत जास्त प्रती क्विंटल २८० रुपये भावातच दिला पाहिजे असा सरकारचा आग्रह होता. खरे म्हटले तर, यंदा गव्हाची किंमत यापेक्षा अधिक असावी अशी कृषि उत्पादन खर्च आणि मूल्य आयोगाची, एवढेच नव्हे तर, कृषिमंत्र्यांचीही शिफारस होती. खुल्या बाजारपेठेत प्रती क्विंटल ३५० रुपयांचा भाव चालू असतांना सरकारने शेतकऱ्यांकडून २८० रुपयांत गहू मिळवण्याचा खटाटोप केला आणि त्याची फजिती झाली. त्याचवेळी ३५० रुपयांच्या आसपास भाव शेतकऱ्यांना देऊ केला असता तर वाटेल तेवढा गहू सरकारला मिळाला असता आणि आज ५५० रुपये प्रतिक्विंटल परदेशी चलनाचा खर्च करून गव्हाची आयात करण्याची सरकारवर पाळी आली नसती.

यंदा भरपूर उत्पादन असता, तुटवडा नसतांना हे सरकार गव्हाची आयात करीत आहे आणि देशी गव्हाच्या किंमती पाडू पहात आहे या धोरणाचा एक परिणाम निश्चित आहे. देशातील गव्हाचे उत्पादन पुढील वर्षापासून कमी होईल आणि आपले अन्नधान्याच्या बाबतीत परावलंबित्व वाढीला लागेल. पंडित नेहरूंच्या काळात असलेच करंटे धोरण वर्षानुवर्षे राबवले गेले आणि परिणाम असा झाला की देश अधिकाधिक परावलंबी बनला. लाल बहादूर शास्त्रींच्या काळानंतर फुकट किंवा स्वस्त धान्य देशात आणून ओतण्याचे धोरण थांबवण्यात आले आणि देश स्वावलंबी झाला.

नेहरू धोरणाचा घरबुडवेपणा राव सरकार पुन्हा एकदा करत आहे त्याला संघटनेचा विरोध आहे.

**संघटना खुल्या अर्थव्यवस्थेचा पाठपुरावा करते आणि आयातीला विरोध करते हे कसे?**

सरकारने जाहीर केलेली ३० लाख टन गव्हाची आयात ही खुल्या बाजारपेठेतील आयात नाहीच. शेतकऱ्यांना धडा शिकविण्याकरितां सरकारने उभे केलेले हे कारस्थान आहे.

**या आयातील विरोध करण्याचे काम महाराष्ट्रतील शेतकऱ्यांनी का करावे? महाराष्ट्रात थोडा गहू पिकतो आणि त्याला बरा भाव मिळतो तरी महाराष्ट्रीय शेतकऱ्यांनी आंदोलनात का उतरावे?**

गव्हाची आयात हा समग्र शेतकरी समजावरील हल्ला आहे. आज पंजाबी शेतकऱ्याचा बळी जातो आहे, उद्या मराठी शेतकऱ्याचाही जाईल. किंबहुना, आजही कापसाच्या निर्यातीवर निर्बंध घालून महाराष्ट्रीय शेतकऱ्याची गळचेपी केली जात आहे.

शेतकरी आंदोलनाने शेगावच्या जाहीरनाम्यात घोषणा केल्याप्रमाणे खुल्या व्यवस्थेत शासन जेथे जेथे बाधा निर्माण करील तेथे तेथे सरकारचा कडाडून विरोध करण्याचा वसा शेतकऱ्यांनी घेतला आहे.

**या गव्हाच्या आयातीत आणखी काय दोष आहेत?**

सगळे दोषच दोष आहेत. कमी प्रतीचा गहू, दामदुप्पट किंमत देऊन केलेल्या या आयातीने देशातील उत्पादन घटणार. त्यासाठी, सध्याच्या आर्थिक अरिष्टाच्या काळात चार हजार कोटी रुपयांचे परकीय चलन उधळून एका बाजूला खुल्या बाजारपेठेचे घोष चालू असताना शेतीच्या बाबतीत मात्र घरबुडवे करंटे नेहरू धोरण. धोरणाची वेळ अशी की पंजाबमधील परिस्थिती सुधारण्याची थोडी आशादायक चिन्हे दिसत असतांनाच पंजाबी शेतकऱ्याचा

संताप व्हावा अशी ही कारवाई सरकारने केली आहे, हे देशाचे दुर्भाग्यच नाही काय? **गव्हाची आयात करून महागाई कमी करता येईल असे अर्थमंत्र्यांनी म्हटले आहे, त्याबद्दल काय?**

स्वातंत्र्यानंतरच्या ४५ वर्षात कित्येक पटीने महागाई झाली. ही महागाई सरकारी उधळमाधळीने झाली, तुटीच्या अर्थव्यवस्थेमुळे झाली, चुकीच्या आर्थिक धोरणांमुळे झाली. शेतीमालाचे भाव वाढल्यामुळे महागाई वाढली असे एकही उदाहरण नाही. एका बाजूला गव्हाची आयात करायची आणि दुसऱ्या बाजूला पेट्रोल महाग करून किंमती भडकावायच्या अशा मार्गाने महागाई आटोक्यात कशी येईल?

■ ■ ■

## शेतकरी संघटक वर्गणीसंबंधी

१) आपल्या अंकावर वर्गणी संपल्याचा शिक्का आल्याआल्या पोस्टात जाऊन पुढील वर्षाची वर्गणी रुपये ३०/- पाठवावी म्हणजे आपल्या अंकात खंड पडणार नाही.

२) आपली नवीन वर्षाची वर्गणी पाठविताना त्याच मनिऑर्डर फॉर्ममध्ये आणखी एक वर्गणीदाराची वर्गणी पाठवून आपण संघटकचे वाचक, पर्यायाने संघटनेचे पाईक वाढवू शकता.

३) कोणी कार्यकर्ता आपल्याकडे वर्गणी नेण्यास येईल अशी वाट पहात बसल्यास आपण काही अंकांना मुकण्याची शक्यता आहे.

## बातम्या पाठवा

आपल्या गावी / शेजारच्या गावी झालेल्या आंदोलन कार्यक्रमाची तसेच, नाकेबंदीसाठी जाण्याच्या तयारीची माहिती कार्ड किंवा आंतर्देशीय पत्रावर लिहून पाठवा.

# यावर्षीचा १४ नोव्हेंबर गावोगावी ‘नेहरूनीती दहन’ दिन

२ ऑक्टोबर १९९२ रोजी प्रत्येक जिल्ह्यात नेहरूनीतीचे दहन करण्यात आले. १४ नोव्हेंबर १९९२ रोजी आता गावोगाव ‘नेहरूनीती’च्या प्रतीकाचे दहन करण्यात येईल आणि त्यानंतर न्हावा-शेवा येथील बंदराचे नाव जवाहरलाल नेहरू बंदर आहे ते बदलण्यासाठी शेतकरी घराबाहेर पडतील.

कारखानदारीचा बडेजाव, नोकरशाहांची मिरासदारी आणि शेतकऱ्याचे मरण म्हणजे नेहरू धोरण. हे धोरण राबवले अनेकांनी पण त्या धोरणाचे जनक नेहरू.

२ आक्टोबरच्या कार्यक्रमात दहनासाठी वेगवेगळ्या प्रकारची चित्रे वापरली गेली. त्यामुळे काहीसा गोंधळ कार्यकर्त्यांच्या मनात दिसतो.

१४ नोव्हेंबरच्या कार्यक्रमात शेतकरी संघटक १) ६ जुलै ९२ आणि २) ६ सप्टेंबर ९२ मध्ये प्रसिद्ध झालेले नेहरूनीतीचे व्यंगचित्रच या निषेध प्रदर्शक कार्यक्रमासाठी वापरण्यात यावे.

# गव्हाच्या आयात धोरणाविरुद्ध न्हावा-शेवा बंदर रोकण्याची तयारी सुरू

गव्हाची आयात थांबविण्याकरिता शेतकरी संघटना १४ नोव्हेंबर १९९२ पासून आंदोलन करणार आहे.

या आंदोलनाचा निर्णय शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीने औरंगाबाद येथील बैठकीत ११ ऑक्टोबर १९९२ रोजी घेतला. देशात अन्नधान्याचे, विशेषतः गव्हाचे मुबलक उत्पादन आहे. अशा परिस्थितीत देशातील शेतकऱ्यांना गव्हाची प्रती क्विंटल २८० रु. किंमत देणारे सरकार क्विंटलमागे ६५० रुपयांच्या वर खर्च करून परदेशी गहू देशात आणीत आहे. हे धोरण शेतकरी द्वेष्टे आणि देशघातकी आहे; केंद्र शासन ज्या खुल्या अर्थव्यवस्थेचा गाजावाजा करते आहे त्याच्या विरुद्ध आहे. खुल्या अर्थव्यवस्थेचे धोरण फक्त ''इंडिया'स लागू आहे, आणि ''भारता''स मात्र जुने, बदनाम, शेतकरीद्वेष्टे नेहरू-धोरणच लागू ठेवण्याचा सरकारचा इरादा आहे, हे स्पष्ट आहे.

शेतकऱ्यांवरील हा अन्याय दूर करण्यासाठी न्हावा-शेवा बंदरातील सर्व वाहतूक बंद करण्याचा शेतकरी संघटनेचा निश्चय आहे. आजपर्यंत तीन बेटी गहू कॅनडातून न्हावा-शेवा बंदरात उतरला आहे. यापुढील महत्त्वाचा बोटींचा ताफा गहू घेऊन न्हावा-शेवा बंदरात उतरेल त्यावेळी प्रत्यक्ष बंदर रोकण्याची तारीख जाहिर केली जाईल.

या आंदोलनाची पूर्वतयारी म्हणून महाराष्ट्रातील शेतकरी पुढील कार्यक्रम राबवितील.

(१) १० नोव्हेंबर १९९२ पासून ज्वारी, कापूस व ऊस यांना रास्त भाव मिळावा यासाठी केंद्र व राज्य शासनांच्या सर्व मंत्र्यांना महाराष्ट्रभर गावबंदी करण्यात येईल.

(२) १४ नोव्हेंबर १९९२ रोजी महाराष्ट्रात प्रत्येक गावी नेहरु-नीतीच्या पुतळ्यांचे दहन करण्यात येईल.

आणि त्यानंतर न्हावा-शेवा बंदरात जाण्यासाठी शेतकरी स्त्रीपुरुष तयारी करून बंदर रोकण्याची घोषणा होताच बंदराकडे कूच करण्यासाठी सज्ज राहतील.

नेहरूधोरणाचा कळस म्हणजे परकीय चलनाच्या संकटाच्या काळात पंधराशे कोटींच्या वर रुपये खर्च करून दुप्पट भावाने गव्हाची आयात करणे. ही आयात नेहरूंचे नाव दिलेल्या न्हावा-शेवा बंदरातून होत आहे. शेतकरी स्त्रीपुरुष न्हावा-शेवा बंदरात जातील, गव्हाची आयात थांबवितील आणि शेतकरीद्वेष्ट्या नेहरूंचे न्हावा-शेवा बंदराला दिलेले नाव रद्द करतील.

■ ■ ■

# न्हावा-शेवा नाकेबंदीच्या तयारीसाठी शरद जोशींचा महाराष्ट्र-दौरा

नेहरूनीतीने होणाऱ्या गहू आयातीचा विरोध करण्यासाठी शेतकरी संघटनेतर्फे होणाऱ्या न्हावा-शेवा बंदराच्या नाकेबंदी कार्यक्रमाच्या तयारीसाठी शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी महाराष्ट्रव्यापी दौरा करणार आहे. या दौऱ्यात ते जिल्ह्याजिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या बैठका तसेच वार्ताहर परिषदा घेऊन त्यामध्ये खुल्या अर्थव्यवस्थेच्या संदर्भात शेतकरी संघटनेच्या न्हावा-शेवा बंदर नाकेबंदी, मंत्र्यांना गावबंदी, नेहरूनीती प्रतिमेचे दहन या आंदोलन-कार्यक्रमाची भूमिका स्पष्ट करून सांगतील. काही जिल्ह्यांत विद्यार्थ्यांच्या मेळाव्यांतही श्री. शरद जोशी मार्गदर्शन करतील.

## दौऱ्याचा दिनक्रम

| | |
|---|---|
| १४-१५ नोव्हेंबर ९२ | सोलापूर |
| १६ नोव्हेंबर ९२ | कोल्हापूर |
| १७ नोव्हेंबर ९२ | सांगली* |
| १८ नोव्हेंबर ९२ | उस्मानाबाद |
| १९ नोव्हेंबर ९२ | लातूर |
| २० नोव्हेंबर ९२ | अंबाजोगाई |
| २१ नोव्हेंबर ९२ | नांदेड |
| २२ नोव्हेंबर ९२ | परभणी |
| २३ नोव्हेंबर ९२ | जालना |
| २४ नोव्हेंबर ९२ | औरंगाबाद |
| २५ नोव्हेंबर ९२ | बुलढाणा |
| २६ नोव्हेंबर ९२ | अकोला (विदर्भ) |
| २७ नोव्हेंबर ९२ | अमरावती |
| २८ नोव्हेंबर ९२ | यवतमाळ |
| २९ नोव्हेंबर ९२ | चंद्रपूर** |
| ३० नोव्हेंबर ९२ | नागपूर*** |
| १ डिसेंबर ९२ | वर्धा |
| २-३ डिसेंबर ९२ | पनवेल, अलिबाग न्हावा-शेवा परिसर |
| ४ डिसेंबर ९२ | जळगाव |
| ५ डिसेंबर ९२ | धुळे |
| ६ डिसेंबर ९२ | नाशिक**** |

* सांगली येथील बैठकीत सातारा जिल्ह्यातील कार्यकर्ते सहभागी.

** चंद्रपूर येथील बैठकीत गडचिरोली जिल्ह्यातील कार्यकर्ते सहभागी.

*** नागपूर येथील बैठकीत भंडारा जिल्ह्यातील कार्यकर्ते सहभागी.

**** नाशिक येथील बैठकीत अहमदनगर जिल्ह्यातील कार्यकर्ते सहभागी.

दौऱ्यातील बैठका व वार्ताहर परिषदा आयोजित करण्याच्या बाबतीत जिल्हाप्रमुखांना मार्गदर्शन व मदत करण्यासाठी सर्वश्री पाशा पटेल, शंकर धोंडगे व राम नेवले या कार्यकारिणी-सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| पाशा पटेल : | सोलापूर, कोल्हापूर, सांगली, उस्मानाबाद, लातूर, अंबाजोगाई |
| शंकर धोंडगे : | नांदेड, परभणी, जालना, औरंगाबाद, जळगाव, धुळे, नाशिक. |
| राम नेवले : | विदर्भातील सर्व जिल्हे |

# गुजरातमधील शेतकरी गव्हाची आयात रोकण्यास न्हावा-शेवा बंदरात येणार

दक्षिण गुजरातमधील सुरत, बलसाड, डांग, भडोच जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचा एक प्रचंड मेळावा सूरत जवळ नवी पारडी या गावी खेडूत समाजातर्फे ३१ ऑक्टोबर ९२ रोजी आयोजित करण्यात आला होता. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या ११७ व्या जयंती दिनी आयोजित केलेल्या या मेळाव्याला या चार जिल्ह्यांतून सुमारे तीस हजार शेतकरी हजर होते.

मेळाव्याला सर्वश्री लाभशंकर उपाध्याय, मगनभाई पटेल, करसनभाई पटेल, भूपेंद्र सिंह मान, शरद जोशी यांनी मार्गदर्शन केले.

श्री. भूपेंद्रसिंह मान यांनी आपले राज्यसभेतील अनुभव कथन करून सरकार-दरबारी शेतकऱ्यांचा प्रश्न कुणी मांडू लागले की सगळ्यांचेच कान व तोंडे बंद कशी होतात याची माहिती दिली. महाराष्ट्र व गुजरातमधील शेतकऱ्यांनी न्हावा-शेवा बंदराची नाकेबंदी करून गव्हाच्या आयातीला विरोध करण्याचे आंदोलन हातात घेतले आहे याबद्दल पंजाबच्या शेतकऱ्यांच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करून त्यांनी म्हटले की यामुळे आपण सर्व शेतकरी एक आहोत, एकाच भारत-भूमातेची लेकरे आहोत हेच यातून सिद्ध होते आहे.

श्री. शरद जोशी यांनी राव शासनाच्या गहू आयातीच्या कारस्थानाचे विश्लेषण करून शासनाची ही कृती शासनाच्या नेहरूनीतीने शिकविलेल्या शेतकरीद्वेष्टेपणाचे निदर्शक कशी आहे समजावून दिले. नेहरूनीती अंतर्गत अर्थव्यवस्था बदलली तरच शेतकरी सुखी होऊ शकेल असे सांगून शेतकऱ्यांना पायदळी तुडविणाऱ्या या नेहरूनीतीचा शेतकऱ्यांनी आणि शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींनी उघडपणे आणि स्पष्टपणे निषेध करणे आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. हा उघड विरोध नोंदविण्यासाठीच शेतकरी संघटनेने न्हावा- शेवा बंदराच्या नाकेबंदीचे आंदोलन जाहिर केले असून त्या आंदोलनाचे वेळी 'महात्माजींनी दिलेला विकासाचा मंत्र पायदळी तुडवून शेतकऱ्यांना लुटणाऱ्या नीतीचा अवलंब करणाऱ्या नेहरूंचे या बंदराला दिलेले नाव शेतकरी रद्द करतील, असे सांगताच टाळ्यांचा प्रचंड कडकडाटात शेतकऱ्यांनी या घोषणेचे स्वागत केले व न्हावा-शेवा आंदोलनात येण्याची तयारी दर्शविली.

या मेळाव्याचा समारोप नेहरू नीतीच्या प्रतिकाचे श्री. शरद जोशी यांच्या हस्ते दहन करून करण्यात आला.

धुळे जिल्ह्याच्या नंदुरबार तालुक्यातील दीडदोनशे शेतकरी श्री. भरत पाटील यांच्या नेतृत्वातील या मेळाव्याला आले होते.

भडोच जिल्हा खेडूत समाजाच्या महिला कार्यकर्त्या सुश्री दमयंतीबेन पटेल यांनी महिलांच्या तुरळक उपस्थितीबद्दल खेद व्यक्त करून यापुढे प्रत्येक पुरुष कार्यकर्त्याने कार्यक्रमाला येतांना आपल्याबरोबर घरातील किमान एका स्त्रीला बरोबर घेऊन यावे असे आवाहन भाषणात केले.

## शेतकरी हुतात्मादिन, दहा नोव्हेंबरपासून
# मंत्र्यांना गावबंदी

नमुना प्रश्न

* **कारखानदारीला खुल्या अर्थव्यवस्थेचा लाभ मग शेतीवरच बंधने का?**
* **उसाला टनामागे ४५० रुपयांहून अधिक भाव देता येत असेल तर तो शेतकऱ्यांना का मिळू द्यायचा नाही?**
* **कपाशीची हमी किंमत कधी जाहिर करणार?**
* **हमी भाव व आधारभूत भाव एकच असेल तर एकाधिकार काय म्हणून?**
* **शेतीमालाची खरेदी केंद्रे उघडण्यास विलंब किंवा टाळाटाळ का?**
* **देशात गहू मुबलक असतांना देशातील शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या किमतीच्या दुप्पटीहून जास्त खर्च करून गहू आयात करणे ही शासनाने शेतकऱ्यांविरुद्ध सुरू केलेली लढाईच नाही का?**
* **या लढाईत तुम्ही कोणाचे प्रतिनिधी? लुटारू शासनाचे की अन्नदात्या शेतकऱ्याचे?**
* **उद्या जर, शेतकऱ्यांनी नाही केला पेरा, तर तुम्ही प्रजेला खाऊ काय घालाल, धत्तुरा?**
* **'शेतीमालाला रास्त भाव' हे तत्त्व सगळेच मान्य करतात, मग तो मिळू नये म्हणून होणाऱ्या कटकारस्थानात सामील का राहातात?**

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 6th, November 1992

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
November 6, 1992

**To**

**PNCW 281**
Licence to post without prepayment **No. 87**

# न्हावा-शेवा बंदर नाकेबंदी बाबू गेनू स्मृतिदिनी?

१२ डिसेंबर १९३० रोजी पुणे जिल्ह्याच्या आंबेगाव तालुक्यातील महाळुंगे-पडवळ येथील शेतकऱ्याघरचे एक पोरगे मुंबई येथील मुळजी जेठा मार्केटात विलायती कापडांनी भरलेल्या ट्रकसमोर आडवे पडले ट्रकचा भारतीय चालक पोटाची पर्वा न करता गाडीतून खाली उतरला पण गोऱ्या चालकाने ती गाडी त्या पोराच्या अंगावरून त्याला चिरडत पुढे काढली आणि बाबू गेनू हुतात्मा झाला. बाबू गेनूचे मायबाप कापूस पिकवीत नव्हते. पण, गोऱ्या इंग्रजांनी देशाच्या चालविलेल्या शोषणाचे कापूस हे एक प्रतिक आहे असे महात्माजींनी सांगितले होते तेवढे त्याला उमजले होते.

या देशातील शेतकऱ्यांचे शोषण देश गोऱ्या इंग्रजांच्या तावडीतून सुटला तरी चालूच आहे; किंबहुना, अधिक कठोरतेने चालू आहे. आज देशातील शेतकऱ्यांना धुळीस मिळविण्याचा, नेहरूनीतीने चालणाऱ्या काळ्या इंग्रजांच्या शासनाने जणू चंग बांधला आहे. गव्हाचे मुबलक उत्पादन झाले असतांनासुद्धा काळ्या इंग्रजांचे हे शासन परदेशातून महागडा गहू आयात करून शेतकऱ्यांना मारू पाहात आहे.

गोऱ्या इंग्रजांच्या काळी कापूस हे शोषणाचे प्रतिक होते, आज काळ्या इंगजांच्या काळात ते गहू झाले आहे. सुमारे दीड लाख टन गहू, न्हावा-शेवा बंदरांतून देशभर रवाना झाला आहे. बोटींचा नवीन ताफा येऊ घातला आहे. तो डिसेंबर महिन्यात येथे पोहोचण्याची शक्यता आहे.

गहू हे महाराष्ट्राचे पीक नाही; ते उत्तरेतील पीक आहे. त्याच्याशी आपला काय संबंध असा विचार महाराष्ट्रातले शेतकरी करणार नाहीत कारण, हुतात्मा बाबू गेनूने त्यांना आदर्श घालून दिलेला आहे.

आणि काय सांगावे, कदाचित्, गव्हाच्या बोटींचा ताफा १२ डिसेंबरलाच बंदराला लागायचा! न्हावा-शेवा बंदराच्या पश्चिमेला दूर किनाऱ्यावरून हुतात्मा बाबू गेनूंचा आत्मा आतुरतेने पाहात असेल की पंजाब, हरियानाच्या शेतकऱ्यांचा गहू मातीमोल करण्यासाठी काळ्या इंग्रजांनी आणलेला विलायती गहू वाहाणाऱ्या ट्रक आणि गाड्या आपले महाराष्ट्रीय वारस अडवितात की नाही ते.

# दहा नोव्हेंबर शेतकरी हुतात्मा दिन

शेतीमालाला रास्त भाव या शेतकऱ्यांच्या श्रमसिद्ध हक्कासाठी, शेतकरी हुतात्मा भावांनो, तुम्ही आपले प्राण वेचले. तुमच्या सांडलेल्या रक्ताची आठवण ठेवून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी गेली दहा वर्षे अशी लढाई केली की 'शेतीमालाला रास्त भाव' ही संकल्पना देशात प्रस्थापित झाली आहे. अगदी, तुमच्यावर गोळ्या झाडणारेसुद्धा शेतीमालाला रास्त भाव मिळाला पाहिजे असे उघड उघड बोलू लागले आहेत.

ते बोलतात म्हणजे देतील असे नाही. आणि हक्क कोणी दिले म्हणजे मिळतात असेही नव्हे, तर ते मिळवावे लागतात, संपादन करावे लागतात. म्हणून हुतात्मा भावांनो, आम्ही गेल्या वर्षी शेगाव येथे जमून शेतीमालाला रास्त भाव मिळविण्यासाठी एक जाहिरनामा काढला आणि चतुरंग शेतीच्या साहाय्याने शेतीमालाचे भाव मिळविण्याचा निर्धार केला.

आमच्या उद्यमशील शेतीसाठी आणि ती करण्याआड येणाऱ्या कुप्रवृत्तींशी सामना करण्यासाठी शेतकरी संघटनेच्या आम्हा सर्व पाईकांस, हुतात्मा भावांनो, शुभेच्छा द्या.

आम्ही सर्व पाईक आपणा सर्वांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करून प्रतिज्ञा करतो की **शेतकऱ्याला सुखाने व सन्मानाने जगता यावे यासाठी चालू झालेला हा लढा विजयी होईपर्यंत आम्ही लढवीत राहू.**

## शेतकरी संघटनेचा विजय असो.

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक — मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ — गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण २३५४, २४६८**

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**